|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## आरती श्रीसत्यनारायणाची

जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा। पंचारति ओंवाळू श्रीपति तुज भक्तिभावा ।। जय० ।। धृ० ।।

विधियुक्त पूजुनी करिती पुराण श्रवण। परिमळद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून।
घृतयुक्त शर्करामिश्रित गोधूमचूर्ण। प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तू नारायण ।। जय० ।।१।।

शतानंदविप्रे पूर्वी व्रत हें आचरिलें। दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें।।
त्यापासुनि हैं व्रत या कलियुगिं सकळां श्रुत झालें। भावार्थं पूजितां सर्वां इच्छित लाधलें ।। जय०।।२।।

साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें। इच्छित पुरतां मदांध होऊनि व्रत न आचरिलें।
त्या पापानें संकटिं पडुनी दुःस्वहिभोगिलें। स्मृति होउनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ।। जय० ।।३।।

प्रसाद विसरूनि पतिभेटीला कलावती गेली। क्षोभ तुझा होतांचि तयाचि नौका बुडाली।
अंगध्वजरायाची यापरि दुःखस्थिती आली। मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णी परिसली ।। जय०।।४।।

पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं। पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं।
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनि। ऐसा भक्तां संकटिं पावसि तूं चक्रपाणी।। जय० ।।५।।

अनन्यभावें पूजुनि हें व्रत जे जन आचरति । इच्छित पुरविसी त्यातें देउनि संतति संपत्ती।
संहारिसी -भवदुरितें सर्वहि बंधनें तुटती।। राजा रंका समान मानुनि पावसि श्रीपती ।। जय० ।।६।।

ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णं मी कैसा। भक्तिपुरस्सर आचरती त्यां पावसि जगदीशा।
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा। मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ।।
जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा० ।।७।।


# HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com